**सं.फौ.के.नं. ७४/२०१८**
**नि. क्र. ३५**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ यांचा जबाब शपथेवर सुरु</u>.**

**नाव** – कौस्तुभ श्रीनिवास गोरे,

**वय** - ४२ वर्षे, **व्यवसाय** – वामन हरी पेटे ज्वेलर्स रत्नागिरी येथे ब्रॅन्च मॅनेजर,

**राहणार** – रत्नागिरी, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेतर्फे</u> -**

०१. दि. १३/०१/२०१८ रोजी मी रत्नागिरी येथे दुकानातच होतो. अनिकेश प्रल्हाद शिवलकर माझया कंपनीमध्ये कॅशिअर म्हणून काम करतो. त्याचा दिनांक १३/०१/२०१८ रोजी अपघात झाला होता. मी त्याला कार्यालयाच्या कामासाठी त्यादिवशी चिपळूण येथे पाठविले होते. मी त्याला माझी दुचाकी एमएच-०८-एएल-२२६७ ही चिपळूणला जाण्याकरीता दिली होती. चिपळूण येथे काम झाल्यानंतर त्याने मला फोन करुन चिपळून मधून निघाले असल्याचे कळविले. मला त्यानंतर फोन आला की, वांद्री सप्तलिंग पूल येथे त्याचा अपघात झाला आहे. मला सांगण्यात आले की, त्याच्यावर उपचाराकरीता रत्नागिरी येथे त्याला आणले जात आहे. मला सांगण्यात आले की, त्याला एका ट्रेलरने ठोकर दिल्याने अपघात झाला होता. ट्रेलरचा नं. एमएच-४६-८१०८ असा समजला. मला असेही सांगण्यात आले की, त्याचा पाय तुटला आहे. दिनांक १९/०१/२०१८ रोजी मला पोलीस स्टेशनमधून कळविण्यात आल्यानंतर मी माझी दुचाकी देवरुख पोलीस स्टेशनमधून ताब्यात घेतली. पोलीसांनी त्यादिवशी माझयाकडे अपघाताविषयी चौकशी केली होती त्यांना मी घटनेविषयी बाब मी सांगितली होती.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास - आरोपीतर्फे विधीज्ञा श्री. आर. के. शिंदे यांचेकडून</u> -**

०२. हे म्हणणे खरे आहे की, अपघात मी प्रत्यक्ष पाहिला नाही त्यामुळे निश्चीत अपघात कसा झाला याबाबत मला माहिती नाही. पोलीसांनी माझे वाहन माझया ताब्यात दिल्याबाबत सही घेतली होती. दिनांक १९/०१/२०१८ रोजी संध्याकाळी माझे वाहन माझया ताब्यात देण्यात आले.

**प्रश्न** - तुम्ही सांगितले आणि पोलीसांनी लिहून घेतले असे काही घडले नाही?

**उत्तर** - मी सांगतो की, मला पोलीसांनी विचारलेल्या नंतर मी उत्तरे दिली.

हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना दुचाकी माझी असल्याबाबत केवळ माहिती दिली. हे म्हणणे खरे नाही की, मला समजले की, हा अपघात ट्रेलरने दुचाकीला ठोकर दिल्याने झाला हे मी खोटे सांगत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.06.13 17:45:05 +0530

**(श्रीमती एस. एच. पाटील)**
**न्यायदंडाधिकारी वर्ग-१ देवरुख.**

**दिनांक - १३/०६/२०२४**